**पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांचे कार्यालय**
**पत्ता- चव्हाणनगर, पाषाण रोड, पुणे ४११००८**
**दुरध्वनी क्रमांक (०२०)२५६५७८७८**
ई मेल आय.डी.- sp.pune.r@mahapolice.gov.in




---

## प्रेस नोट दि. १५/१०/२०२६

## लोणावळा शहर पोलीस स्टेशन हद्दीत परदेशी नागरिकांची फसवणूक करण्यासाठी अवैधरित्या चालवल्या जाणाऱ्या कॉल सेंटरवर कारवाई करुन २० आरोपींना अटक, त्यांचेकडून ३६ लाख ४१ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

### स्थानिक गुन्हे शाखा व लोणावळा शहर पो.स्टे पुणे ग्रामीण यांची कारवाई

दिनांक १४/१०/२०२६ रोजी लोणावळा शहर पोलीस स्टेशन हद्दीतील मौजे नांगरगावचे हद्दीत ओमेगा सोसायटी येथील देव व्हीला ता.मावळ जि.पुणे येथे काही इसम एकत्रित येवून कट रचुन अवैध्यरीत्या कॉल सेंटर चालवित आहेत. अशी बातमी मिळाल्याने लोणावळा शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री.महेश विधाते यांनी सदर घटनेचे गांभीर्य लक्षात घेवून ताबडतोब मा.पोलीस अधीक्षक श्री.संदीप सिंह गिल्ल यांना व इतर वरिष्ठ अधिकारी यांना सदरचे प्रकाराबाबत माहिती दिली, त्यांचेकडून प्राप्त झालेले आदेश व मार्गदर्शनाप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री.प्रमोद क्षीरसागर, लोणावळा शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री.महेश विधाते यांना तपास पथकासह छापा कारवाई करण्याबाबत सूचना दिल्या.

त्याप्रमाणे पोलीस निरीक्षक महेश विधाते,लोणावळा शहर पोलीस स्टेशन, पोसई अभिजीत सावंत स्थानिक गुन्हे शाखा, पोहवा/बाळासाहेब खडके, पोहवा/संदीप मानकर, पोहवा/प्रशांत बुनगे, पोहवा/सागर नामदास, पोहवा/सिध्देश पाटील, पोहवा/संतोष शेळके, पोहवा/ गणेश होळकर, पोकॉ/धनंजय आगवणे, पोकॉ/श्रीराम बोऱ्हाडे व दोन पंच असे छापा कारवाईसाठी लागणारे साहित्यासह खाजगी वाहनाने रवाना होवून मौजे नांगरगावचे हद्दीत ओमेगा सोसायटी येथील देव व्हीला ता.मावळ जि पुणे येथे जावुन पोलीस निरीक्षक महेश विधाते यांनी बंगल्याचा दरवाज वाजविला तेव्हा एका इसमाने दरवाजा उघडला. त्यावेळी कायदेशीररित्या पोलीस स्टाफ व पंचा समवेत घरामध्ये प्रवेश केला, त्यावेळी हॉलमध्ये काही इसम हे कानाला हेड फोन लावुन, मांडीवर लॅपटॉप ठेवुन, हातात मोबाईल फोन कोणा सोबत तरी फोनवर इंग्रजीमध्ये बोलत होते व लॅपटॉपवर इंग्रजीमध्ये चॅटींग करीत असल्याचे दिसले. तसेच हॉलला लागुन असलेल्या बेडरूम मध्ये सुध्दा काही इसम बेडवर लॅपटॉप, मोबाईल फोनवर इंग्रजी भाषेमध्ये काम करताना काही लोक दिसून आले. तसेच त्यांचे जवळील काही लोकांकडे लॅपटॉप होते. त्यावेळी त्यांना येथे काय काम सुरू आहे, असे विचारणा केली असता, त्यांनी येथे कॉल सेंटर चालु असल्याचे सांगितले. त्याबाबत त्यांच्याकडे कॉल सेंटर चालविण्याचा अधिकृत परवान्याबाबत मागणी केली असता, त्यांनी उडवाउडवीचे उत्तरे दिल्याने त्यांच्याकडे परवाना नसल्याचे निदर्शनास आले. तसेच त्यांना कॉल सेंटरचे प्रमुखा बाबत विचारणा करता इसम नामे मौफैज उर्फ नाजिश आरीफ शेख याने इरफान अब्दुल गफुर खान व समीर इरफान शेख हा प्रमुख असल्याचे त्याने आम्हाला सांगितले. सदर कॉल सेंटर मध्ये चालु असलेल्या कामाबाबत त्यांचेकडे अधिक चौकशी केली असता, ते सर्व विदेशी लोकांना लॅपटॉप वरील ॲपवरून तसेच मोबाईल व्दारे वेगवेगळया ॲपचा वापर करून इंटरनेट कॉल करुन नामांकीत कंपनी ॲमेझॉन, गुगल इत्यादीचे बनावट कागदपत्रे व ओळखपत्रे बनवुन त्यांचे प्रतिनिधी असल्याचे भासवुन वेगवेगळया प्रकारची स्कीम व्दारे लोकांना फसवणुकीचे इराद्याने अमेरिका, कॅनडा व इतर देशातील नागरिकांना सांगुन त्यांचा बँक डाटा प्राप्त करत होते, तसेच त्यांचे क्रेडीट कार्ड, एटी.एम कार्ड अशी माहिती त्यांच्याकडुन प्राप्त करून, त्यांचे बनावट बँकेचे संबंधीत मौल्यवान कागदपत्र बनवने. तसेच ग्राहकांनी मागविलेल्या पार्सलमध्ये अंमली पदार्थ मिळून आलेले आहेत, अशी ग्राहकांना भीती दाखवुन खंडणी मागत असल्याने निष्पन्न झाले असल्याने यातील आरोपी नामे **१) अमान इंमतीया शेख,वय २१ वर्षे , रा. गेट नंबर ८, नियर गायकवाड नगर बस डेपो, रूम नंबर १३ मालवणी मलाड वेस्ट मुंबई, २) मो. फैज उर्फ नाजिश आरीफ शेख, वय- २६ वर्षे, रा.रूम नं बी-१०, स्नेह पुनम सी एच एस प्लाट नं १३, आर एस सी ७, मालवणी मलाड वेस्ट मुंबई, ३) मोहम्मद अफजल शेख हर्शद शेख वय २६ वर्षे रा. मलाड मलावणी मुंबई, ४) कुलदीप मनोज बागडी वय ३७ वर्षे रा. माटुंगा लेबर कॅम्प चाळ नंबर एफ ८ रूम नंबर १२ माटुंगा मुंबई, ५) रिहान सलम घनानी वय-१९ वर्षे, रा गायकवाड नगर बस डेपो समोर ताफरान हॉटेल मालवाणी मलाड वेस्ट मुंबई, ६) मोहम्मद अलीरजा सययद वय २१ वर्शे रा. मलाड मलवणी मुंबई, ७)तावीश मेहबुबआली शेख वय २० वर्षे रा. चाळ नंबर १२५ रूम नंबर ९९३ मलाड मालवणी मुंबई, ८) कामरान ईसामुदीन शेख वय २० वर्शे रा. रूम नंबर २ शमीन बानु चाळ जवळ एनटीसीसी हायस्कुल गेट नंबर ७ मालवणी मालाड मुंबई, ९) सदाम चॉद खान वय ३० वर्षे, रा. रूम नंबर ३०६ जी एन ०६ स्क्वाटर्स कॉलनी मलाड मालवणी मुंबई, १०)सुजल खुमबहादुर राणा, वय ३५ वर्षे, रा. फॉरेस्ट कॉलनी शिलॉग मेघालय, ११) अब्दुल आहात मोहम्मद रफिक खान वय २२ वर्षे रा. मालवणी मलाड मुंबई, १२) झाहिद वाहिद शेख, वय २१ वर्षे रा. मालवणी डेपो ८ नंबर गायकवाड नगर मलाड मालवणी वेस्ट मुंबई, १३)जाहीद आजम शेख, वय २० वर्षे रा. मलाड मालवणी मंबई, १४) धनराज देवजीत बोस वय २६ वर्षे रा. बदलापुर सुविषा अपार्टमेट रूम नंबर २**

**बी विंग, १५)शादाब जावैद सययद वय २६ वर्षे रा.गेट नंबर ८ जवळ बस डेपो प्लॅट नंबर ७३ मालवाणी मलाड वेस्ट मुंबई, १६) इरफान अब्दुल गफुर खान वय ४१ वर्षे रा. रूम नंबर १२२ प्लॅट नंब ८ ए गेट नंबर ५ ओल्ड कलेक्टर बंगला मलवनी मलाड मुंबई, १७) समीर इरफान षेख वय- ३३ वर्षे, रा. रूम नं १३ गेट नं ७ एन टी सी सी स्कुल जवळ मलाड , मालवणी वेस्ट मुंबई १८) इरशाद इरफान शेख, वय- ३२ वर्षे, रा. गुप्ता चाळ रूम नंबर ७ मलाड वेस्ट मुंबई १९) अमिर सिराज खान वय ३१ वर्षे व्यवसाय- व्यवसाय, रा. ४०७ बी विंग, बिल्डींग क्र ९, पोलीस क्रमांक क्वार्टर ,क्र ८ मालवणी मलाड वेस्ट मुंबई. २०) मकसुद शमिम चैधरी वय-२० वर्षे, रा हो कॉलनी ए व्ही सी समोर एम एच इंग्लीश हायस्कुल मालवणी डेपो गेट नं ८ मालवणी मलाड मुंबई** यांना ताब्यात घेवुन **त्यांचेकडुन मोबाईल फोन, लॅपटॉप, रोख रक्कम, चारचाकी वाहने असा एकुण ३६ लाख ४१ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.** त्याबाबत आरोपी विरुध्द **लोणावळा शहर पो स्टे गु.र.नं २४०/२०२६ भारतीय न्याय सहिंता कलम ३१९ (२),३१८ (४), ६१(२), ३०८, ३३८, ३३६ (२),३३९, ३५२ ,३ (५), सह कलम माहीती तंत्रज्ञान अधिनियम २००८ चे कलम ६६(सी), ६६(डी), इंडीयन टेलिग्राम ॲक्ट कलम २०,२१ प्रमाणे** गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींना मा.न्यायालयासमक्ष हजर करणेत आले असुन सदरचे आरोपी सध्या पोलीस कोठडी रिमांड मध्ये आहेत.

सदरची कामगिरी मा.पोलीस अधीक्षक श्री. संदीप सिंह गिल्ल, साो. पुणे ग्रामीण, मा.अपर पोलीस अधीक्षक डॉ. शुभम कुमार, पुणे विभाग, मा.उपविभागीय पोलीस अधिकारी श्री.गजानन टोंम्पे, लोणावळा उपविभाग,यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री.प्रमोद क्षीरसागर, पोलीस निरीक्षक श्री.महेश विधाते, लोणावळा शहर पोलीस स्टेशन, स्था.गुशा.चे पोसई अभिजीत सावंत, स्था.गु.शा.चे पोलीस अंमलदार संतोष शेळके, गणेश होळकर, सागर नामदास, प्रशांत बुनगे, सिध्देश पाटील, भारत मोहोळ, चेतन पाटील, अजय देडे लोणावळा शहर पोलीस स्टेशन चे कुतबुद्दीन खान, देविदास चाकणे,सतीश घोंगडे, विंकटेश सानाकाला,बाळासाहेब खडके, संदीप मानकर, अंकुश पवार, धनंजय आगवणे, श्रीराम बोराडे, संजय तेलंग, गणेश लाटे, योगेश कोकीळे, सचिन चव्हाण, अक्षय दातखिळे, होमगार्ड कोकाटे, उगले, घारे, कडरे, यांनी केली असून पुढील तपास पोलीस निरीक्षक श्री.महेश विधाते, लोणावळा शहर पोलीस स्टेशन हे करत आहे.

**पुणे ग्रामीण पोलीस**